# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
## छत्रपती संभाजीनगर.

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
स्टेशन रोड छत्रपती संभाजीनगर ,उस्मानपुरा ,– ४३१००५ (महाराष्ट्र)
"In Pursuit of Technical Excellence"
■ - office: (०२४०) २३६६१०१, २३६६१०२, २३६६१११
**e-mail** – principal.gcoeaurangabad@dtemaharashtra.gov.in**web** : www.geca.ac.in


**जा.क्र. शाअमछसं/आस्था-३/२०२६/**3665   दिनांक : 12 1 OCT 2026

कार्यालयीन सूचना (प्राचार्यांना भेटण्याबाबत व चर्चा करण्यासाठी)

संस्थेच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजामध्ये सुसूत्रता, पारदर्शकता व कार्यक्षमता राखणे तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या आणि अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय अडचणीचे वेळेत निराकरण करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने संबंधितांना त्यांच्या समस्या, सूचना व प्रलंबित बाबी थेट प्राचार्यांसमोर मांडता याव्यात, यासाठी प्राचार्यांशी भेटण्याची साप्ताहिक वेळ निश्चित करण्यात येत आहे. त्यानुसार, खालीलप्रमाणे साप्ताहिक भेटीचे वेळापत्रक खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| वार | संबंधित घटक | भेटीची वेळ |
|---|---|---|
| दर बुधवार | संस्थेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी | दुपारी 2.00 वाजल्यापासून |
| दर गुरुवार | संस्थेतील अधिकारी ,कर्मचारी माजी विदयार्थी व औद्योगीक क्षेत्राशी निगडीत अभ्यागत, कंत्राटदार, पुरवठादार | दुपारी 2.00 वाजल्यापासून |

सूचना व कार्यपद्धती

०१. संबंधितांनी निर्धारित दिवशी व वेळेत प्राचार्यांची भेट घेऊन आपली समस्या, अडचण, सूचना अथवा प्रलंबित प्रकरण संक्षिप्त व मुद्देसूद स्वरूपात मांडावे.

०२. शक्यतो संबंधित विषयासंबंधी अर्ज, निवेदन, आवश्यक कागदपत्रे व पूर्वी केलेल्या पत्रव्यवहाराचा तपशील सोबत आणावा, जेणेकरून प्रकरणाची वस्तुस्थिती तपासून योग्य निर्णय घेणे सुलभ होईल.

०३. शैक्षणिक, प्रशासकीय, आस्थापना, वसतिगृह, विद्यार्थी सुविधा व इतर संस्थांतर्गत विषयांबाबत संबंधित विभागप्रमुख अथवा विभागीय स्तरावर आवश्यक कार्यवाही करूनही प्रश्न प्रलंबित असल्यास, त्याबाबतची वस्तुस्थिती प्राचार्यांसमोर मांडता येईल.

०४. संस्थेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन शिस्त, निर्धारित कामकाजाची वेळ व संस्थेच्या प्रशासकीय कार्यपद्धतीचे पालन करून भेटीस उपस्थित राहावे. तसेच, विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कामकाजात अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

०५. तातडीच्या व अत्यावश्यक स्वरूपाच्या बाबींसाठी निर्धारित भेटीच्या दिवसाची प्रतीक्षा न करता प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रचलित कार्यपद्धतीनुसार प्राचार्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

०६. भेटीदरम्यान प्राप्त झालेल्या अर्ज, निवेदने व सूचनांवर संबंधित विभागाने नियमानुसार आवश्यक कार्यवाही करावी. आवश्यकतेनुसार प्रकरणांचा पाठपुरावा करून त्यांची सद्यस्थिती प्राचार्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

०७. सर्व विभागप्रमुखांनी ही सूचना आपल्या अधिनस्त अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी. तसेच, संस्थेच्या सूचना फलकावर व अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.

सदर सूचना संस्थेतील कामकाज अधिक शिस्तबद्ध, विद्यार्थी-केंद्रित व परिणामकारक करण्याच्या दृष्टीने निर्गमित करण्यात येत असून, सर्व संबंधितांनी याची नोंद घेऊन सहकार्य करावे.

(डॉ. संजय पुण्या शामराव डांभरे)
**प्राचार्य**
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर.

**प्रत :**

१. संस्थेतील सर्व विभागप्रमुख यांनी त्यांच्या अधिनस्त अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्यासाठी.
२. संस्थेचे मुख्या सूचना फलक प्रसिद्धीसाठी.
३. संस्थेचे संकेतस्थळ/प्रोग्रामर यांना प्रसिद्धीसाठी.
४) आस्था १,३,४/प्रश. अधि./का. अधि./प्रबंधक/लेखा/रोखा/ ग्रंथालय/जिमखाना/वसतिगृह/ परीक्षा विभाग